
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. २९९२




IRBK-0102992

मूल्य सहा आणे




# बाल-हितोपदेश

## भाग पहिला

लेखक
दामोदर विठ्ठल मनोहर

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0102992

मूल्य सहा आणे

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९३९
पुनर्मुद्रण : १९४३, १९४९

प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई

मुद्रक
जयराम दिपाजी देसाई
राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई

गोष्टी तुम्ही वाचणार आहां, त्या गोष्टी फार
एका पंडिताने तिघां राजपुत्रांस सांगितलेल्या

काळीं उत्तर हिंदुस्थानांत पाटलिपुत्र नांवाच्या
राजा राज्य करीत होता; त्याचें नांव सुदर्शन.
मुलगे होते. हे तीनही राजपुत्र बुद्धीनें अगदीं मंद
च्या अंगीं साधें व्यवहारज्ञानही नव्हतें. यामुळें
जाला मोठी चिंता पडली. शेवटीं आपल्या प्रधानाचा
ऊन राजानें आपल्या तिघां पुत्रांस पाटलिपुत्र
तील विष्णुशर्मा नांवाच्या विद्वान् पंडिताच्या घरीं
रितां नेऊन ठेविलें.

ुशर्मा पंडित या राजपुत्रांना रोज सुंदर गोष्टी सांगत
मित्र कसा जोडावा, मैत्रींत फूट कां पडते, युद्धाचे प्रसंग
येतात, शत्रूंशीं तह कसा करावा वगैरे विषयांवर त्यानें
र सुंदर सुंदर गोष्टी राजपुत्रांस सांगितल्या; यामुळें थोड्याच
दिवसांत त्या राजपुत्रांचा मूर्खपणा नाहींसा होऊन त्यांच्या अंगीं
ातुर्य व व्यवहारज्ञान आलें. मग त्या राजपुत्रांस विष्णुशर्मा
डितानें परत घरीं पाठविलें. आपल्या मुलांच्या अंगीं
शाहाणपणा आलेला पाहून राजास फार आनंद झाला.

विष्णुशर्म्यानें राजपुत्रांस पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्यांपैकीं
हुतेक सर्व तुम्हांस या दोन भागांत वाचावयास सांपडणार
ाहेत.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | पिंजऱ्यांतील वाघ व ब्राह्मण .... | ५ |
| २ | वानर आणि मगर .... .... | ९ |
| ३ | एक ब्राह्मण व तीन ठक .... .... | १५ |
| ४ | उपद्व्यापी वानर .... .... | १८ |
| ५ | कुबेराचा भक्त .... .... | २२ |
| ६ | बडबडणारें कांसव .... .... | २५ |
| ७ | निळा कोल्हा .... .... | २९ |
| ८ | कावळा आणि लावा ... ... | ३५ |
| ९ | बगळा आणि खेंकडा ... ... | ३८ |
| १० | ससे आणि हत्तींचा कळप.... ... | ४३ |
| ११ | वाघाचें सोंग केलेलें गाढव.... ... | ४८ |
| १२ | घंटाकर्ण राक्षस ... ... | ५२ |

# १ पिंजऱ्यांतील वाघ आणि ब्राह्मण

एक जंगल होतें. त्या जंगलांत एक मोठा
वा राहात असे. किती भयंकर होता तो !
जूबाजूच्या गांवांत जाऊन तो मेंढरें, वासरें
व पळवी. एका शेतकऱ्यास याचा फार राग
डा होता. एके दिवशीं त्यानें त्या जंगलांत
ज एक पिंजरा लावून ठेविला. नेमका त्याच
र वाघ त्या पिंजऱ्यांत सांपडला ! रात्रभर
र खूप धडपड केली, आरडाओरड केली,
पर्थ ! त्याची शक्ति कांहीं बाहेर येण्यास
े पडेना. त्याला मोठा विचार पडला.
पाला एक युक्ति सुचली. मग सकाळपर्यंत
प बसला.

जंगलांतून दुसऱ्या गांवीं जाण्याकरितां
र. फलवाट होती. सकाळीं या वाटेनें एक
ला, ह्मण चालला होता, तो वाघानें पाहिला.
ाणि गोड बोलण्याला हा ब्राह्मण फसतो कीं
रीत वें, असें ठरवून वाघ त्या ब्राह्मणास

म्हणाला, ' अहो भटजी, तुम्ही मोठे परोपकारी दिसतां. मी पाहा किती संकटांत आहें बरें ! सोडवाल का मला यांतून ? तुम्हांला एक सोन्याचें कडें देऊन मीही तुमचा उपकार लगेच फेडीन. फक्त या पिंजऱ्याचें दार तेवढें उघडा आणि सोन्याचें कडें घ्या. मी सुटेन आणि तुम्हीही खूप श्रीमंत व्हाल.'

खरोखर किती हें गोड बोलणें ! भोळा ब्राह्मणच तो, फसला आणि सोन्याच्या मोहांत पडला. त्यानें पिंजऱ्याचें दार उघडलें मात्र, तों काय गंमत झाली ! त्या वाघानें धाडकन् त्या ब्राह्मणाच्याच अंगावर उडी टाकून त्यास धरिलें आणि म्हटलें, ' भटजीबुवा, तुम्हांला सोन्याचें कडें पाहिजे काय ? अहो, मजजवळ कोठलें कडें ? आतां तुम्हांलाच खाऊन टाकतों, म्हणजे झालें !'


हें ऐकून तो गरीब ब्राह्मण अगदीं घाबरून गेला. थोडा धीर धरून तो त्या वाघास म्हणा ' वाघोबा, मीं तुला पिंजऱ्यांतून सोडविलें अ तूं तर मलाच खावयास बघतोस ! चांगली

तुझी ही. अरे, फार झालें तर सोन्याचें कडें मला देऊं नको. म्हणून काय माझा जीव घेशील? बाबा, थोडा थांब; कोणीतरी लवकरच या बाजूस येईल. त्याला आपण न्याय विचारूं. मग काय करायचें तें तूं खुशाल कर.'

वाघानें मनांत विचार केला कीं, येथें कोणी येणार नाहीं आणि कोणी आलेंच तरी माझ्या-विरुद्ध न्याय होणार नाहीं. मग तो वाघ थोडा थांबला. थोडा वेळ गेला आणि एक कोल्हा तेथून जाऊं लागला. त्यास त्या ब्राह्मणानें हाक मारून थांबविलें आणि सारी हकीकत सांगून न्याय विचारिला.

तो कोल्हा फार धूर्त होता. आपणास यांतलें कांहीं समजलें नाहीं असें दाखवून तो म्हणाला, 'भटजीबुवा, तुम्ही तर मोठे लुच्चे दिसतां! काय हो, आमचे वाघोबा या पिंजऱ्यांत मावतील तरी कसे? आणि तुम्हांस तर हें दार मुळींच उघडतां येणार नाहीं. काय वाघोबा, मी म्हणतों हें खरें ना?'

वाघ ऐटीनें म्हणाला, 'मी या पिंजऱ्यांत होतों ही गोष्ट खरी, पण या भटजीनें दार उघडलें




कोल्ह्यानें सांगितल्याबरोबर त्यानें धाडकन् त्या पिंजऱ्यांत उडी टाकली.

हें मात्र साफ खोटें ! या जंगलचा राजा मी, मला काय हें दार उघडतां येणार नाहीं ?’

कोल्हा हसून म्हणाला, ‘बरोबर, अगदीं बरोबर. भटजीबुवा, तुम्ही जर खरे असाल तर दाखवाल का पुन्हा हें दार उघडून? उघडून दाखवा, नाहीं तर मरणास तयार व्हा.’

कोल्ह्याची युक्ति ब्राह्मण समजला आणि दार उघडून दाखविण्यास तयार झाला. वाघास मात्र कोल्ह्याचा कावा समजला नाहीं. कोल्ह्यानें सांगितल्याबरोबर त्यानें धाडकन् त्या पिंजऱ्यांत उडी टाकिली, तों काय गंमत झाली ?—

कोल्होबानें लगबग करुनी दार लाविलें झटकन् ।
म्हणे, ‘ब्राह्मणा, वेडा असशी ! चल जा येथून’ ॥

---

## २ वानर आणि मगर

एका नदीच्या कांठीं एक भलें मोठें जांभळीचें झाड होतें. या जांभळीवर बसून एक वानर जांभळें खात असे. या नदींत एक मगर होता. तोही त्या झाडाखालीं येई आणि खालीं पडलेलीं जांभळें खात असे. तो वानरही त्या मगरासाठीं

कांहीं जांभळें खालीं टाकी आणि त्या मगराशीं गप्पागोष्टी करी. यामुळें त्या दोघांची चांगलीच गट्टी जमली होती.

पण मगर फार दुष्ट होता. जांभळें फार गोड असतात, तेव्हां तीं रोज खाणाऱ्या वानराचें काळीजही फारच गोड बनलें असावें असें त्या मगराला वाटूं लागलें. हें त्याचें काळीज जर आपल्याला खावयास मिळेल तर फार छान होईल असा विचार त्याच्या मनांत येऊं लागला. पण हें जमावें कसें ? वानराला फसवून जर नदींत नेतां आलें, तर त्यास बुडवून मारितां येईल आणि मग त्याचें काळीज खातां येईल असा दुष्ट विचार त्यानें चालविला. मग एके दिवशीं तो नदीच्या कांठावर गेला असतां वानराच्या व त्याच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या.

मगर म्हणाला, 'मित्रा, बरी आठवण झाली. तूं मला रोज जांभळें देतोस. तेव्हां तुला घरीं नेऊन चांगला पाहुणचार करावा असा माझा बेत आहे. येशील का तूं माझ्या गरिबाच्या घरीं ?'

वानर म्हणाला, ‘ तुझा आग्रहच असला तर येईन मी. पण हें जमावें कसें ? तुझें घर असणार या नदीच्या पलीकडे आणि मला कांहीं पोहतां येत नाहीं. तेव्हां इच्छा असून काय उपयोग ? ’

तेव्हां मगरानें मायाळूपणाचा आव आणून म्हटलें, ‘ एवढीच जर तुझी अडचण असेल तर तूं माझ्या पाठीवर बैस. मी तुला पलीकडे माझ्या घरीं नेईन. दोनचार दिवस तेथें राहा, माझा पाहुणचार घे आणि मग मी तुला परत आणून पोंचवीन. ’

मग एकंदर बेत ठरला. तो वानर त्या मगराच्या पाठीवर बसला आणि तो मगर नदीच्या पाण्यांतून झपझप जाऊं लागला. ऐन मध्यावर गेल्यावर मगर एकाएकीं थांबला आणि त्या वानरास म्हणाला,

‘ मूर्ख वानरा, बरा सांपडलास ! तुला माझा पाहुणचार पाहिजे काय ? विसर बरें आतां तो. मीच आतां तुझा खासा समाचार घेणार अरे,—

फसविला तुला मी पाहीं,
म्हणतील मूर्ख तुज सर्व ॥

अनुक्रम 25026
9200
3/3/6


पाहिजे तुझें काळीज,
रक्ताची अतिशय मौज,
चाखुनी पाहिन आज,
युक्तीचा करिशी गर्व,
म्हणतील मूर्ख तुज सर्व ॥'

हें ऐकून तो वानर थोडा घाबरला. पण तोही पक्का बिलंदर होता. आपल्या मनाशीं युक्ति योजून तो चटकन् म्हणाला,

'हा वेड्या, मग तूं आधींच कां नाहीं बोललास? निघण्यापूर्वींच बोलला असतास तर तिकडेच त्या जांभळीच्या झाडाखालीं नसतें का तें दिलें? आतां इकडे कोठलें माझें काळीज?'

तेव्हां मगर म्हणाला, 'म्हणजे? तूं म्हणतोस तरी काय? तुझें काळीज तुझ्याबरोबर नाहीं?'

वानर म्हणाला, 'छे! मग काय पंचाईत होती? अरे, आम्ही वानर नेहमीं झाडांवरून उड्या मारितों, दंगामस्ती करितों, अशा वेळीं तें खालीं पडून फुटण्याची धास्ती असते. म्हणून तें आम्ही नेहमीं एकाद्या झाडावर ठेवितों. आतां



वळ तूं मागें । पोहुनियां अतिशय वेगें ॥

तुला जर माझें कालीज पाहिजे असेल तर फक्त एकच उपाय आहे!'

तेव्हां मगर आशेनें म्हणाला, 'सांग पाहूं काय उपाय आहे तो. मी तो अवश्य करीन.'

वानर म्हणाला, 'एक तर–

चल तूं मागें । पोहुनियां अतिशय वेगें ॥
घेऊनि जाईं ऐल तिराला ।
कालिज आणुनि देइन तुजला ।
जरुरी त्याची नाहिंच मजला ।
चल तूं मागें । पोहुनियां अतिशय वेगें ॥'

वानराचा कावा त्या मगराच्या मुळींच लक्षांत आला नाहीं. कालीज मिळविण्याच्या आशेनें तो भराभर निघाला. कांठाजवळ जातांच वानर एकदम उडी मारून एका झाडावर चढला व त्या मगरास म्हणाला—

'मूर्खा, कालीज कधीं झाडावर का असतें? प्रत्येक प्राण्याचें कालीज त्याच्या शरीरांतच असतें, तसेंच माझेंही आहे. चल चालता हो येथून! वानराचें कालीज तुला कधींही मिळावयाचें नाहीं बरें!'

हें ऐकून मगर पुरा खजील झाला. त्यानें सुळकन् पाण्यांत उडी टाकिली. त्या झाडाशीं तो परत कधीं आला नाहीं.

---

## ३ एक ब्राह्मण व तीन ठक

एका गांवांत एक ब्राह्मण राहात होता. त्यास एक यज्ञ करावयाचा होता. यज्ञासाठीं एका बोकडाची जरुरी होती. त्या गांवीं बोकड विकत मिळण्यासारखा नव्हता. चौकशी करितां दूरच्या एका गांवीं बोकड मिळूं शकेल असें त्या ब्राह्मणास समजलें. तेव्हां भटजींची स्वारी त्या दूरच्या गांवीं गेली आणि तेथें एक चांगलासा बोकड विकत घेऊन परत आपल्या गांवीं येण्यास निघाली.

भटजी बोकड आणण्यास गेला आहे ही बातमी त्या गांवच्या तीन ठक मनुष्यांस समजली. तेव्हां तो बोकड त्या ब्राह्मणापासून पळविण्याचा त्या ठकांनीं विचार केला. त्यांनीं एक युक्ति ठरविली आणि ब्राह्मण परत येण्याच्या वाटेवर ते अंतराअंतरानें उभे राहिले आणि भटजींची वाट पाहूं लागले.

कांहीं वेळ गेल्यावर तो ब्राह्मण येतांना दिसला. तेव्हां पहिला ठक त्यास सामोरा गेला. ठकानें हसत हसत ब्राह्मणास नमस्कार केला आणि त्या बोकडाकडे बोट दाखवून म्हटलें—

' खांद्यावरि हा श्वान घेउनी, स्वारी ही तुमची ।
वाहवा ! भटजी ! कुठें चालली ? लाज न लोकांची ?॥'

हें ऐकून भटजी चपापला. त्यानें एकदां आपल्या खांद्यावरच्या बोकडाकडे पाहिलें आणि तो कुत्रा नाहीं अशी खात्री झाल्यावर त्या ठकास उत्तर दिलें—

' अरे भामट्या, अप्पलपोट्या, कशास फसवीसी ?
घरीं चाललों बोकड घेउनि पवित्र यज्ञासी ? '

इतकें म्हणून तो ब्राह्मण पुढें चालूं लागला. थोडासा पुढें गेल्यावर त्याला तो दुसरा ठक भेटला. ब्राह्मणास पाहून त्या ठकानें आश्चर्य वाटल्यासारखें केलें आणि त्यास विचारिलें—

' काय भटजी, स्वारी कुठें गेली होती ? आणि खांद्यावर हा कुत्रा कशाला चालविला आहे ? अहो, कुत्र्याला कोणी असा खांद्यावर का घेतात ?

लोक तुम्हाला हसतील नाहीं का ? ठेवा त्याला खालीं ! वेडे कुठले !'

हें ऐकून भटजी ओशाळल्यासारखा झाला. त्यानें पुन्हा खांद्यावरच्या बोकडाकडे नीट पाहिलें आणि रागानें म्हटलें—

'बोकडाला कुत्रा म्हणणारा तूंच मूर्ख दिसतोस! चांगले पांच रुपये दिले आहेत या बोकडाला, समजलास ? बोकड कधीं तूं पाहिला तरी आहेस का ?'

ठक म्हणाला—

'यांत काय संशय ? असे कितीक बोकड मीं विकत घेतले आहेत. बोकड कधीं पांच रुपयांना मिळत नसतो महाराज ! वेडेच तुम्ही, कोणीं तरी फसविलें झालें तुम्हांला !'

हें ऐकून भटजीस शंका येऊं लागली. आपण फसलों तर नाहीं ना, असा विचार करीत स्वारी तशीच पुढें निघाली; तों तिसरा ठक सामोरा आला आणि भटजीकडे आश्चर्यानें पाहात म्हणाला—

'वाहवा ! वाहवा !! भटजीबुवा तुमचें डोकें फिरलें कीं काय ? अहो, कुत्र्याला कधीं ब्राह्मण

शिवतो का ? आणि तुम्हीं तर त्याला खांद्यावर घेतलें आहे ! शोभतें का हो तुम्हांला हें ? '

आतां मात्र ब्राह्मण ओशाळल्यासारखा झाला आणि विचार करूं लागला. हें पाहून तो ठक लागलीच म्हणतो, ' अहो विचार कसला करितां ? इतका वेळ हा कुत्रा तुम्हांला चावला कसा नाहीं कोण जाणे ! तो पहा आतां रागावून गुरगुरल्यासारखें करीत आहे ! चावेल हो, सांभाळा ! !'

मग काय, भटजींची स्वारी पुरी घाबरून गेली. आपल्या खांद्यावर बोकड नसून कुत्रा आहे अशी आतां त्यांची खात्री झाली. लगेच भटजीनें त्या बोकडास खालीं टाकिलें व मागें न पाहातां घरचा रस्ता सुधारला !

ब्राह्मण दिसत नाहींसा झाल्यावर त्या तीन ठकांनीं बोकडास घेतलें व आडमार्गानें ते आपल्या घरीं गेले.

---

## ४ उपद्व्यापी वानर

एका गांवाबाहेर दोन अरकशी एक भलें मोठें लाकूड चिरीत होते. जवळच एका झाडावर कांहीं

वानर बसले होते. त्यांतील एक वानर तें काम कौतुकानें पाहात होता. अरकशी खालीं वर हात करून काय करीत आहेत याची त्यास मोठी गंमत वाटत होती. ही मौज जवळ जाऊन पाहावी असें त्या वानरास एकसारखें वाटत होतें. पण ते अरकशी आपणांस झोडतील या भीतीनें तो खालीं मात्र गेला नाहीं.

कांहीं वेळानें ते अरकशी चिरलेल्या लाकडांत पाचर ठोकून ठेवून गांवांत निघून गेले. मग मात्र या वानराची खालीं जाण्याची गर्दी उडाली. त्यानें किलकिलाट करून आपल्या सोबत्यांस जवळ बोलाविलें, आणि त्या चिरलेल्या लाकडाकडे हात करून तो वानर म्हणाला, ‘ चला रे खालीं त्या ओंड्यावर ; मी पाहा तुम्हांला कशी गंमत करून दाखवितों. ’

यावर त्याचा एक मित्र बोलला, ‘ नको रे बाबा, आम्हांला नाहीं त्याची माहिती ; आणि जर का ते लोक आले तर आपल्याला मारतील. ’

तेव्हां दुसरा एकजण म्हणाला, ‘ अरे चल, हा आहे मित्रा, मी येतों तुझेबरोबर. पण मी

आपला दूर उभा राहीन हो ! तुझी नुसती गंमत पाहीन. '


आतां कसला उशीर ? लगेच ते दोघे वानर झाडावरून खालीं गेले. मित्र दूर थांबला. तो वानर मात्र लांब लांब उड्या मारीत त्या ओंड्यावर जाऊन बसला. त्यानें इकडे तिकडे पाहिलें. कोणीहि येत असलेलें दिसलें नाहीं. मग तो चिरून झालेलें लाकूड पाहूं लागला. तोंच त्याला ती ठोकून ठेविलेली पाचर दिसली. तो ती हालवून पाहूं लागला. पण ती त्याला मुळींच हलेना. तेव्हां त्याला फार चीड आली. लगेच त्यानें आपले दोन्ही पाय त्या ओंड्यावर दोहोंकडे ठेविले, ती पाचर हातांत गच्च धरिली आणि मोठा जोर करून तो ती पाचर काढूं लागला.

आणि मग लवकरच काय गंमत झाली ?—

निघुनि पाचर पुच्छ कोवळें ।
चिमटा बसुनि रडूं कोसळे ।
विनवुनि सांगे करा मोकळें । पुच्छ तुम्ही सगळे ॥

उपद्व्यापी वानर ओरडतांना पाहून झाडावरील पुष्कळ वानर खालीं आले होते. पण ते तरी

निघुनि पाचर पुच्छ कोंवळें। चिमटा बसुनि रडूं कोसळे।
विनवुनि सांगे करा मोकळें। पुच्छ तुम्ही सगळे॥



काय करणार ? शेपटी अगदीं गच्च अडकून गेली होती आणि तो वानर सारखा ओरडत होता. इतक्यांत ते अरकशीही येऊन पोहोंचले. मग सगळ्यांची धांदल उडाली. सर्वजण उड्या मारीत झाडावर गेले. अरकशी जवळ आलेला पाहून तो उपद्व्यापी वानर जास्तच घाबरून गेला. त्या अरकशांच्या हातांत एक काठी होती. त्यांनीं त्या उपद्व्यापी वानराची शेपटी सोडविली आणि त्यास चोप देऊन हांकून लाविलें.

---

## ५ कुबेराचा भक्त

एका गांवांत एक मनुष्य राहात होता. बिचारा अगदीं दरिद्री होता. रोज पोटभर अन्न त्याला कधीं मिळालेंच नाहीं. कधीं कधीं तर त्याला दोन दोन दिवस उपास पडे. त्यामुळें तो अगदीं वैतागून गेला. त्याच गांवांत कित्येक श्रीमंत लोक होते. ते गाडींतून थाटानें जात तेव्हां याला फारच वाईट वाटे. त्यांच्यासारखें श्रीमंत कसें होतां येईल याचा सारखा तो विचार करी. शेवटीं त्यानें ठरविलें कीं, एकदां कुबेराची

तपश्चर्या करावी. तो देवांचा सावकार प्रसन्न झाला तर मग आपणास हवी तितकी श्रीमंती येईल.

मग त्यानें कुबेराचें तप चालविलें. त्याची भक्ति पाहून कुबेर प्रसन्न झाला, आणि रात्रीं स्वप्नांत त्याला दर्शन देऊन म्हणाला, 'भक्ता, तुझें कल्याण असो! तुझी संपत्तीची इच्छा लवकरच पूर्ण होईल. उद्यां तुझे घरीं एक भिक्षु येईल त्यास दया न करतां ठार मार म्हणजे त्याच्या शरीराचें सोनें होईल.' इतकें बोलल्यावर कुबेर गुप्त झाला आणि ब्राह्मण जागा झाला. पहांट झाली होती. लवकरच दिसूं लागलें, तेव्हां तो मनुष्य उठला. त्यानें सर्व आवराआवर केली आणि मोठ्या आशेनें तो एकाद्या भिक्षूची वाट पाहूं लागला.

कांहीं वेळ गेला. मग एक भिक्षु खरोखरच त्या मनुष्याचे अंगणांत आला. त्याचीं वस्त्रें पिवळीं होतीं. अंगावर एक छाटी होती, ती वाऱ्यानें फडफडत होती. हातांत कमंडलु व पायांत खडावा होत्या. आल्याबरोबर तो पुढील

पायरीवर उभा राहिला. त्यानें 'बेटा, तुझें कल्याण होवो!' असा आशीर्वाद देऊन म्हटलें–

भिक्षू असे पावन मर्त्यलोकीं।
अन्नोदकें तुष्ट करी मला कीं॥
इच्छा मनीं तूं धरिली असे जी।
ती पूर्ण होणारचि जाण आजी॥

भिक्षु स्वस्थ उभा राहून त्या मनुष्याकडे पाहूं लागला. तो मनुष्य आंत गेला. त्यानें एक काठी घेतली आणि बाहेर येऊन त्या भिक्षूस ठार मारून टाकिलें. मग पाहतो तों त्या भिक्षूच्या शरीराचें सर्व सोनेंच सोनें झालेलें आहे! इतक्या अवकाशांत त्याचा एक न्हावी त्यास हांक मारण्यास आला. तेव्हां त्या न्हाव्याला हा सारा प्रकार दिसला. लगेच त्या न्हाव्यानें ठरविलें कीं, सोनें मिळण्याची ही फार चांगली युक्ती आहे. आपणही एक भिक्षु मारून टाकूं म्हणजे झालें!

मग तो न्हावी घरीं गेला. भिक्षु पुन्हा कधीं येईल याचा कांहींच नियम नव्हता. तो रोज वाट पाही आणि कोणी भिक्षु आला नाहीं म्हणजे

निराश होई. असे कांहीं दिवस गेल्यावर एके सकाळीं एक भिक्षु त्यास येतांना दिसला. तेव्हां त्या न्हाव्यानें एक चांगली जाडजूड काठी घेतली व त्या भिक्षूची वाट पहात तो दारांत उभा राहिला. लवकरच तो भिक्षु त्या न्हाव्याचे दाराशीं येऊन उभा राहिला व भिक्षा मागूं लागला. तेव्हां न्हाव्यानें आपल्या काठीनें त्यास यथास्थित चोप देऊन ठार मारिलें. तो भिक्षु मरून खालीं पडला, पण त्याचें सोनें कसें होणार ?

न्हाव्यानें एका भिक्षूस ठार मारिलें आहे ही बातमी गांवांत सगळीकडे झाली. लवकरच राजाचे शिपाई त्यास पकडण्यास आले. त्यास पकडून नेण्यांत येऊन या गुन्ह्याबद्दल त्यास चांगलीच शिक्षा केली.

---

## ६ बडबडणारें कांसव

एका मोठ्या तळ्यांत एक कांसव राहात होतें. तळ्यांत नेहमीं भरपूर पाणी असे. पाण्यांत राहाण्याचा कंटाळा आला म्हणजे तें हवा खाण्यास बाहेर येई. त्या कांसवाला बडबडण्याची फार

संवय होती. कोणी बोलण्यास मिळालें कीं लागलें सारखें बोलायला ! त्याला सोबतीही मोठे छान मिळाले होते. दोन हंस रोज त्या तळ्यावर येत; तेथें ते स्नान करीत, आणि बसत त्या कांसवाशीं इकडल्या तिकडल्या गप्पा मारीत.

असा हा क्रम पुष्कळ दिवस चालला होता. पुढें एकदां दुष्काळ पडला. पाऊस मुळींच पडला नाहीं. यामुळें तें तळें नेहमींसारखें भरपूर भरलें नाहीं. ऐन उन्हाळ्यांत तें पार आटून गेलें आणि पुढें तर चिखलही आटत चालला. कांसवाला मोठी चिंता पडली. त्या हंसांनाही आपल्या मित्राची स्थिती पाहून वाईट वाटलें.


एके दिवशीं हंस म्हणाले, ' मित्रा, तुझी गत बरी दिसत नाहीं. हें तळें तर कोरडें पडत चाललें. आतां तूं राहणार कसा ? काय बेत केला आहेस तूं ? '

कांसव म्हणालें, ' कसला झाला आहे माझा बेत ! हें तळें सोडून गेलों नाहीं तर लवकरच मी येथें मरणार ! पण जावें कोठें आणि कसें ? कांहीं सुचत नाहीं मला. '

तेव्हां हंस म्हणाले, 'हो, बरी आठवण झाली. येथून फार दूर पुष्कळ पाणी असलेलें एक शोभिवंत सरोवर आहे. या सरोवरावर आमची दुसरी हंस मंडळी राहते. आम्ही मधून मधून त्यांच्या भेटीस जातों. येशील का आमच्याबरोबर?'

त्या रमणीय सरोवरावर जाण्यास कांसव आनंदानें कबूल झालें. दुसरे दिवशीं त्या हंसांनीं एक काठी आणिली व ते कांसवाला म्हणाले, 'तूं या काठीचा मधला भाग तोंडानें घट्ट धरून ठेव. आम्ही काठीचीं दोन टोकें धरून वर उडतों. मात्र तूं जातांना मुळींच बोलावयाचें नाहीं हें लक्षांत ठेव. जर का बोललास तर खालीं पडून ठार मरशील.' कांसवानें ही गोष्ट कबूल करून काठी तोंडांत धरतांच ते हंस झपकन् वर उडाले आणि आकाशांतून जाऊं लागले.

जातां जातां वाटेंत एक गांव लागलें. गांवांतील एका घरासमोर अंगणांत कांहीं मुलें खेळत होतीं. त्यांच्या दृष्टीस ही कासवाची मिरवणूक पडली. तेव्हां त्यांना मोठी मौज वाटली व तीं मुलें एकदम



ओरडून म्हणालीं, 'बघा रे बघा, कांसवाची वरात चालली आहे! कुठें रे चालली ही मंडळी!'

खालीं चाललेली ही गडबड पाहून त्या हंसांना काळजी पडली कीं, हें कांसव आतां आपल्या स्वभावाप्रमाणें बडबडतें कीं काय! पण आतां त्यांनाही तोंड उघडून चालण्यासारखें नव्हतें.

इतक्यांत कांहीं मुलें पुन्हा म्हणूं लागलीं–



कशी आज खाशी भली मौज झाली।
अहा पालखी कांसवाची निघाली ! ॥
कुठें चाललां राजकन्या वराया ? ।
वदे तूं मुखानें अरे कूर्मराया ! ॥

हें ऐकून आतां मात्र कांसवास अगदीं राहवेना ! मुलांचा त्याला फारच संताप आला. यामुळें भान न राहून 'किती वात्रट कारटीं आहेत हीं' असें म्हणण्याकरितां त्यानें तोंड उघडलें. त्याबरोबर अफाट उंचीवरून तें धाडकन् खालीं पडलें व त्याचा चक्काचूर झाला.

---

## ७ निळा कोल्हा

एक मोठें गांव होतें. त्या गांवाबाहेर मोठी सुंदर झाडी होती. या झाडीमध्यें एक कोल्हा राहात होता. त्याला भटकायची फार संवय. दिवसाही तो मधून मधून त्या झाडीमध्येंच हिंडे. शिवाय रात्रीं तो त्या गांवांतही सगळीकडे भटकत असे. एकदां तो कोल्हा असाच रात्रीं त्या गांवांत हिंडत असतां एका रंगाऱ्याच्या घराजवळ गेला. घराच्या पुढील अंगणांत निळा रंग तयार करून भरून

ठेविलेलें एक उघडें पिंप होतें. त्या पिंपांत काय आहे हें तो कोल्हा त्या पिंपांत डोकावून पाहूं लागला. तोंच त्याचा तोल जाऊन तो त्या पिंपांत पडला.

तें रंगाचें पिंप खोल होतें. त्यामुळें त्यास बाहेर येतां येईना. तेव्हां काय करावें या विचारांत तो होता. मग त्यास एक कल्पना सुचली. तेव्हां तो सकाळपर्यंत स्वस्थ राहिला. मग उजाडलें, तेव्हां त्या पिंपांत तो मेल्यासारखा पडून राहिला. कांहीं वेळानें रंगारी सहज त्या पिंपाजवळ गेला. तों त्या रंगाऱ्यास पिंपांत कोल्हा मरून पडलेला दिसला. म्हणून त्या रंगाऱ्यानें पिंप कलतें करून रंग ओतून टाकिला व त्या कोल्ह्यास मेलेला समजून दूर नेऊन ठेविलें. रंगारी जवळ नाहीं अशी संधी साधून तो कोल्हा एकदम उठला. आणि त्यानें जी धूम ठोकली ती आपल्या झाडींत जाऊन पोहोंचे-पर्यंत !

झाडींत जाऊन तो कोल्हा पहातो तों आपणांस निळा रंग आला आहे ! रंग अगदीं पक्का चढला

होता. आतां हा रंग गेला नाहीं तर आपले जातभाई आपणांस हसणार याचें त्यास वाईट वाटूं लागलें. पण तो कोल्हा मोठा हिकमती होता. आपल्या जातभाईंना काय सांगावयाचें तें त्यानें मनाशीं ठरविलें आणि वेळ येईपर्यंत तो स्वस्थ बसला.

लवकरच सूर्य मावळला. काळोख पडूं लागला आणि त्या झाडींतील कोल्हे बाहेर पडूं लागून ' कुई कुई ' ओरडूं लागले. निळा कोल्हाही बाहेर पडला. त्यास पाहून कांहीं कोल्हे हसूं लागले व कांहींजण त्याचेजवळ जाऊन मोठ्या कौतुकानें त्याचा रंग पाहूं लागले.

तेव्हां तो निळा कोल्हा मोठ्या अभिमानानें त्या सर्वांस दूर सारून म्हणाला, ' हां दूर व्हा लवकर! असे वेड्यासारखे पहातां काय? राजाशीं कसें वागावें, हें तुम्हांला कांहींच कसें समजत नाहीं! आजपासून मी तुमचा राजा झालों आहें, समजलांत !'

या बोलण्याचें एका कोल्ह्याला मोठें नवल वाटलें. तो म्हणाला, ' तुला राजा केलें तरी



कोणीं ? आम्हांस तर कांहींच माहिती नाहीं.'

तेव्हां तो कोल्हा गर्वानें म्हणतो, " राजा होण्यास देवाची कृपा लागते; काल या झाडींत मला एक वनदेवता आढळली. किती सुंदर होती मोठी. ती मजकडे पाहून हसली आणि म्हणाली, ' मी तुजवर प्रसन्न होऊन दर्शन दिलें आहे; तूं आजपासून या वनाचा राजा होशील. आणि त्याची खूण म्हणून तुझा रंग निळा होईल !' असें म्हणून तिनें मजवर हात फिरविला आणि ती गुप्त झाली ! मागाहून मी पहातों तों मी खरोखरच निळा झालों आहें; तेव्हां मित्रहो, मला राजा समजून तुम्ही माझी आज्ञा मानिली पाहिजे."

कोल्ह्याचें हें बोलणें सर्वांस खरें वाटलें. आपल्याला वनदेवतेनें राजा दिला म्हणून सर्वांना आनंद झाला. सर्व कोल्हे नम्रतेनें दूर उभे राहिले; त्यांनीं आपल्या राजास लवून नमस्कार करून प्रार्थना म्हटली—

' कृपा केली तुज वन्य देवतेनें ।
मान देऊं, भूपती ! आदरानें ॥

देई आज्ञा तव, नको धरूं शंका।
वनीं आतां वाजवूं तुझा डंका ॥'

याप्रमाणें सर्व कोल्हे प्रजा बनली व तो निळा कोल्हा त्यांचा राजा झाला! तो निळा कोल्हा पुढें आपली सभा भरवूं लागला. हा त्याचा थाट पाहून त्या रानांतील वाघ, सिंह हे सुद्धां त्यास फसले आणि त्यास राजा मानूं लागले. मग काय, तो निळा कोल्हा अगदीं चढून गेला. सभेमध्यें आपल्या जातभाईंना तो तुच्छ मानून वाटेल ती आज्ञा करूं लागला. वाघ–सिंह यांसारखे शूर प्राणी त्याच्या सभेंत येऊन बसूं लागल्यावर त्या कोल्ह्याला आपल्या बांधवांची लाज वाटूं लागली. तेव्हां तो आपल्या बांधवांचा तिरस्कार करून त्यांस दूर सारूं लागला.

हा आपला अपमान त्या बाकीच्या कोल्ह्यांना मुळींच सहन झाला नाहीं. आपण ज्याला राजा समजतों तो एक कोल्हाच आहे, हें वाघ-सिंहांस माहीत नसल्यामुळें ते फसत आहेत हें त्या कोल्ह्यांस माहीत होतें. तेव्हां त्या सर्व कोल्ह्यांनीं

मिळून एक हिकमत केली. एके दिवशीं त्या निळ्या कोल्ह्याजवळ वाघ–सिंह बसले असतां ते सर्व कोल्हे 'कुई कुई' करून ओरडूं लागले. तेव्हां त्या निळ्या कोल्ह्यास भान न राहून तोही आनंदानें ओरडूं लागला. वाघ–सिंहांनीं पाहिलें कीं, हा निळा प्राणीही एक कोल्हाच असून त्यानें इतके दिवस आपणांस फसविलें. लगेच त्यांनीं त्या निळ्या कोल्ह्यास ठार मारून टाकिलें. हें पाहून ते सर्व कोल्हे आनंदानें निघून गेले.

---

## ८ कावळा आणि लावा

एक वडाचें झाड होतें. त्या झाडावर एक कावळा आणि एक लावा पक्षी राहात असत. कावळा मोठा लबाड होता. दिवसभर तो सारखा इकडे तिकडे भटके आणि मोठ्या हिकमती करी. त्याची चांगली चंगळ चालली होती.

लावा पक्षी मात्र असा गडबड्या नव्हता. लबाड पण नव्हता तो. वडाच्या झाडावरून फारसा दूर तो जातच नसे. त्याच झाडावर राही आणि मिळेल त्यावर समाधान मानी.

कावळा सकाळीं बाहेर जाण्यास निघाला म्हणजे त्या लाव्याला म्हणे, 'काय राव, येतां का मजबरोबर ? गंमत होईल मोठी.'

लावा उत्तर देई–

'नकोरे बाबा ! मी कोठें जात नाहीं आणि येत नाहीं !'

मग कावळा हसे, इकडे तिकडे माना वेळवी आणि भुर्कन् निघून जाई.

एकदां शेजारच्या गांवची जत्रा आली. कावळा जत्रेची गंमत पाहाण्यास निघाला. जातांना तो त्या लाव्याला म्हणाला,

'मित्रा, यात्रेला येतोस का ? खूप खूप गंमत पहाशील; चैन होईल मोठी. सिनेमा पहा, पाळण्यावर बस, झोके घे ! चल तर खरा !!'

लावापक्षी नाहीं-होय करूं लागला.

तेव्हां कावळ्यानें फारच आग्रह केला. अगदीं गळ घातली त्याला. तेव्हां तो लावा जाण्यास कबूल झाला.

मग दोघे निघाले; कावळा पुढें, लावा मागें.

कांहीं अंतर गेल्यावर लावा दमला, तसे दोघे एका झाडावर बसले.

इतक्यांत दुरून एक गवळी डोक्यावर हंडा घेऊन त्या झाडाकडेच येतांना दिसला. तसा तो कावळा लाव्यास म्हणतो—

'मित्रा, भूक का लागली ? तो पाहा एक गवळी येत आहे. डोक्यावर हंडा दिसतो ना ? त्यांत दूध दहीं कांहींतरी असेल ! त्यावर युक्तीनें ताव मारूं. मी करीन तसें तूं कर; घाबरूं नको.'

गवळी झाडाजवळून जाऊं लागला. कावळा हळूच उडत गेला आणि भांड्यावर बसून त्यानें आंत चोंच घातली व आंतील कांहींसें मटकाविलें ! दूध होतें तें ! कावळ्यानें काय केलें तें गवळ्याच्या लक्षांत आलें नाहीं. तो तसाच पुढें चालला.

कावळ्यानें याप्रमाणें तीन चार वेळां दूध मटकावल्यावर ती गोष्ट गवळ्याच्या ध्यानांत आली. पण आपल्याला कांहीं समजलें नाहीं असें सोंग करून गवळी मुद्दाम हळूहळू चालला; पण तो चांगला सावध होता.

आतां लावा पक्ष्यानें धीर केला; तो भीतभीतच हंड्याकडे गेला आणि त्यानें आंत चोंच घातली! तोंच गवळ्याच्या काठीचा तडाका त्यास बसला आणि तो धाडकन् दूर अंतरावर तडफड करीत पडला.

हें पाहून कावळा पळाला. तेव्हां लावा स्वतःशींच म्हणतो—

'झालें तें ठीक झालें! त्या लबाड कावळ्याच्या नादीं मीं कां लागावें? मला झालेली शिक्षा अगदीं योग्य आहे.'

---

## ९ बगळा आणि खेंकडा

एका गांवाबाहेर एक मोठें तळें होतें. त्यांत पुष्कळ मासे, खेंकडे, कांसवें वगैरे राहात असत. त्या तळ्यांत भरपूर पाणी असल्यामुळें सर्वजण सुखांत होतीं. कशाचीही काळजी नव्हती त्यांना. त्या तळ्यापासून थोड्या अंतरावर एक दुष्ट बगळा राहात असे. तो आतां म्हातारा झाल्यामुळें तळ्यांतील मासे त्यास मारतां येत नसत. यामुळें तो बगळा अगदीं रोड होत चालला.

एके दिवशीं तो त्या तळ्याच्या कांठीं येऊन मोठमोठ्यानें रडूं लागला. तेव्हां त्याची दया येऊन एका खेंकड्यानें त्यास विचारलें, ' मामा, आज आपण असे एकाएकीं रडत कां आहां?' तेव्हां तो म्हणाला, 'बाळा, काय सांगूं तुला? मला एक मोठी वाईट बातमी समजली आहे. कालच मी असें ऐकिलें कीं, बारा वर्षांचा दुष्काळ नजीक येऊन ठेपला आहे. या आपल्या तळ्यांत हलीं थोडें पाणी आहे. पण तेंही लवकरच सुकून जाईल. आणि मग बाळांनो, तुमची काय दशा होईल रे! मला या आठवणीनेंच रडूं कोसळतें!'

हें त्या खेंकड्यानें तळ्यांतील सर्व माशांस सांगितलें, तेव्हां ते सगळे त्या बगळ्यांजवळ येऊन त्यास विचारूं लागले, 'मामा, तुम्ही म्हणतां तें खरें कीं काय? आमची आतां धडगतच दिसत नाहीं. मामा, आमचें दैवच वाइट! तुम्ही तरी त्याला काय करणार?'

तेव्हां बगळा म्हणाला, 'असें घाबरून कसें बरें चालेल? थोडा धीर धरा. तुमचा माझ्यावर विश्वास

आहे ना? असेल तर मी तुमचा जीव खचित वांचवीन.'

मासे म्हणाले, 'मामा, आतां तुम्हीच काय कराल तें कराल. आमचा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे.'

मग बगळा म्हणाला—

'या आपल्या तळ्यापासून जवळच पुष्कळ पाणी असलेलें व कमळांनीं शोभिवंत दिसणारें एक फार मोठें तळें आहे. तें चोवीस वर्षांतही आटणार नाहीं. तेव्हां जर कोणी माझ्या पाठीवर बसून येईल, तर त्याला मी तिकडे नेईन.'

हें ऐकून 'बाबा, दादा, काका' 'अशा त्याला हांका मारून 'मी अगोदर येतों, मी अगोदर येतों' असें म्हणत ते सर्व मासे त्याच्या भोंवतीं जमले. तेव्हां तो बगळा म्हणाला, 'थांबा, अशी घाई करूं नका; मी तुम्हां सर्वांना क्रमाक्रमानें नेणारच आहें.

मग त्या बगळ्यानें सुरुवात केली. तो क्रमाक्रमानें एकेकास पाठीवर घेऊन तळ्यापासून जवळच एका शिळेपाशीं येई व तिच्यावर त्यांना

आपटून खुशाल खाऊन टाकी. अशा रीतीनें रोज मासे नेण्याचा व खाऊन टाकण्याचा त्यानें सपाटा लाविला.

एके दिवशीं तो खेंकडा त्यास म्हणाला, 'मामा, तुमचें माझें प्रथम बोलणें झालें. मग आज तुम्ही मला न्या ना.' बगळ्यानेंही विचार केला, 'माशांचें मांस खाऊन मला वीट आला आहे. तेव्हां आज या खेंकड्याचा चटणीसारखा उपयोग करावा.' मग तो खेंकड्यास म्हणाला, 'बरें हो बाळा, आज तूं चल.' असें म्हणून त्याला पाठीवर घेऊन तो आपल्या नेहमींच्या ठिकाणाकडे निघाला.

शिळेजवळ येतांच खेंकड्याला तो माशांच्या हाडांचा ढीग दिसला. हीं आपल्या मित्रांचीं हाडें आहेत हें ओळखून तो खेंकडा थोडा घाबरला. बगळ्याचा दुष्टपणा त्याचे ध्यानीं आला. मग कांहींसा विचार करून तो खोट्याच प्रेमानें त्या बगळ्यास म्हणाला—

'मामा पहा, किति खरेंच दमून गेलां ।
कांहो तुम्ही मजसवें मुळिंही न बोलां ? ॥




‘वेड्या, कुठचें आलें आहे दुसरें तळें! या दगडावर आपटून मी तुला खाणार!’

आहे किती अजुनि दूर दुजें तळें तें?।
जाईन कां कधिंतरी सुखरूप तेथें ?॥

तेव्हां तो मूर्ख बगळा हसत म्हणाला, 'वेड्या, कुठचें आलें आहे दुसरें तळें! या दगडावर आपटून मी आतां तुला खाणार !'

असें त्या बगळ्यानें म्हटल्याबरोबर त्या खेकड्यानें चांगलीच गंमत केली. त्यानें त्या दुष्ट बगळ्याची नाजूक मान आपल्या तोंडांतील दोन तीक्ष्ण आंकड्यांनीं पकडली, व घट्ट आवळून ती तोडून त्याचा जीव घेतला. मग बगळ्याची ती मान घेऊन तो आपल्या तळ्यापाशीं आला व त्यानें ती आपल्या मित्रांना दाखवून त्यांना सर्व हकीगत सांगितली.

---

## १० ससे आणि हत्तींचा कळप

एका रानांत मोठें तळें होतें. त्या तळ्याच्या कांठावर झुडपांमध्यें कांहीं ससे राहात असत. सशांचा जीव तो काय, आणि स्वभाव तर फारच गरीब! शांतपणें राहात आणि आनंदांत असत. पण एकदां त्यांच्यावरही मोठें संकट आलें.

एके दिवशीं हत्तींचा एक कळप त्या तळ्यावर आला. तळ्यांतील भरपूर व स्वच्छ पाणी पाहून त्या हत्तींस फार आनंद झाला. तेथें ते पुष्कळ डुंबले आणि तेव्हांपासून रोजरोज ते तेथें येऊं लागले पण यामुळें त्यांच्या पायांखालीं सशांचीं घरटीं मोडूं लागलीं आणि त्या सशांसही दुखापत होऊं लागली. तेव्हां ते सर्व ससे विचारांत पडले.

एक लहान ससा म्हणाला, ‘ आपण हें तळेंच सोडून जावें हें बरें. ’

यावर एक तरुण ससा म्हणाला, ‘ असें चांगलें तळें सोडून कसें चालेल ? त्यापेक्षां कोणास कांहीं युक्ति सुचत असल्यास पाहावी. ’

याप्रमाणें विचार करीत सर्व ससे बसले होते. त्यांत एक म्हातारा ससा होता. त्याला एक छान युक्ति सुचली. ती त्यानें सर्वांना सांगितली. सर्व सशांना ती युक्ति फार आवडली. ते त्या म्हाताऱ्या सशास म्हणाले—

‘ मामा, तुम्हीं युक्ति तर चांगली काढिली. तेव्हां तुम्हीच त्या हत्तींच्याकडे जाऊन कसें काय

जमतें तें पाहा. तिकडे गेल्यावरही कांहीं अडचण आली तर आम्हांस वेळेवर कांहीं सुचणार नाहीं.'

सर्व मंडळीचा आग्रह पडला तेव्हां त्या म्हाताऱ्या सशानें ती कामगिरी आपले हातीं घेतली. मग एके दिवशीं रात्रीं तो ससा त्या हत्तींच्या कळपाकडे गेला. त्यास पाहून एक हत्ती म्हणाला, 'काय ससोजीराव, कशाला आलां इकडे ? किती हो तुम्ही बारीक, आणि ऐट तर बरीच आणिली आहे !'

तेव्हां तो ससा रागानें म्हणाला–

'माझी थट्टा करितां काय ? मी कोण आहें असें तुम्ही समजतां ? मी आमच्या राजाचा वकील आहें, आणि तुम्हांला एक हुकूम देण्याकरितां आलों आहें.'

हें ऐकून हत्ती थोडेसे घाबरले आणि त्यांनीं त्या सशाला राजाचा हुकूम सांगण्याची विनंति केली.

तेव्हां तो ससा ऐटीनें म्हणाला–

'राजा अमुचा चंद्र मनोहर चंद्र सरोवरीं राहे ।
त्रास अम्हांला देतां तुम्ही, मुळिं न तया साहे ॥


पाहा तयारी कशी चालली शासन करण्याची ।
जीव हवा तर मागा माफी अमुच्या राजाची ॥'

हें ऐकून हत्ती विचारांत पडले. आपण रोज सरोवरावर जातों आणि त्यामुळें तेथें राहणाऱ्या सशांना त्रास होत असेल. पण या सशांचा राजा चंद्र कसा? आणि खरोखरच जर यांचा राजा चंद्र असेल तर असा थोर राजा रागावून कसें चालेल? शेवटीं सर्वांनीं ठरविलें कीं, या सशाबरोबर जाऊन तर पाहावें! आलीच वेळ तर मागावी चंद्रराजाची माफी म्हणजे झालें!

मग सर्वजण त्या सशाबरोबर सरोवराकडे गेले. सरोवराचें पाणी स्वच्छ होतें, पण वाऱ्यामुळें हेलकावे खात होतें. या पाण्यांत आकाशांतील चंद्राचें प्रतिबिंब पडलें होतें आणि तें हलल्यासारखें दिसत होतें. तें हेलकावे खाणारें प्रतिबिंब दाखवून तो म्हातारा ससा म्हणाला—

'पाहा, पाहा तो आमचा राजा चंद्र! कसा रागावला असून सारखा कांपत आहे. किती हा तुमच्यावर राग! आतां जर जीव हवा असेल तर मागा त्याची माफी आणि जा येथून!'

राजा चंद्रा, तुझ्या प्रजेला आम्हीं त्रास दिला याची माफी कर. झालें तें होऊन गेलें. पुन्हा मात्र आम्ही इकडे कधींही येणार नाहीं.



भोळे बिचारे ते हत्ती! त्यांना खरा प्रकार मुळींच समजला नाहीं. ते लागलेच चंद्रराजास शरण गेले आणि म्हणाले,

'राजा चंद्रा, तुझ्या प्रजेला आम्हीं त्रास दिला याची माफी कर. झालें तें होऊन गेलें. पुन्हा मात्र आम्ही इकडे कधींही येणार नाहीं.'

मग ते हत्ती रानांत निघून गेले. परत कधींही ते त्या तळ्याकडे आले नाहींत.

---

## ११ वाघाचें सोंग केलेलें गाढव

एका गांवांत एक परीट राहात असे; कपडे वाहून नेण्याकरितां त्यानें एक गाढव बाळगिलें होतें. तो परीट या गाढवास खावयास मात्र मुळींच घालीत नसे. मधूनमधून तें चरावयास जाई, पण लोक त्यास हाकून लावीत. यामुळें त्या गाढवास पोटभर खावयास न मिळून तें अगदीं रोड होऊन गेलें.

आपलें गाढव अगदीं रोड झालेलें पाहून त्या परटास मोठी काळजी लागली. शेवटीं त्या लबाडास एक युक्ति सुचली. त्यानें असें ठरविलें

कीं 'आपण एक वाघाचें कातडें आणावें. हें कातडें गाढवाचे अंगावर नीट बसवून रात्रीं त्यास शेतांत सोडावें; म्हणजे त्यास वाघ समजून लोक भिऊन पळतील. आणि मग त्यास रात्रभर हवें तितकें खावयास सांपडेल.'

मग त्या परटानें एक वाघाचें कातडें मिळविलें आणि आपली युक्ति करून पाहिली. ती चांगली जमली. तें गाढव रात्रभर शेतांत चरून पहांटेच्या वेळीं तट्ट फुगून घरीं परत आलें. मग तो परीट त्या गाढवास रोज रात्रीं चरावयास सोडूं लागला. शेताचे राखणकरी त्यास वाघ समजून भिऊन पळत. मग काय विचारावें, तें गाढव शेतांत जें काय सांपडेल तें खाई आणि रात्रभर खुशाल इकडे तिकडे फिरे. यामुळें लवकरच तें चांगलें लठ्ठ बनलें. आपल्याला आतां नेहमींच पोटभर खावयास सांपडणार म्हणून त्या गाढवास आनंद होऊन त्यास एक गाणेंही सुचूं लागलें—

अहा खाशी जाहली मौज छान ! ।
वाघ समजूनी मिळे मला मान ॥

त्यानें लगेच त्या गाढवास आपल्या सोट्यानें
मरेमरेतों बडविलें.



पिकें माझीं हो ! तशीं सर्व शेतें ! ।
असे राजा मी ! कमी काय मातें ? ॥

आतां तें गाढव मस्त होऊं लागलें. कोणाचीच भीति त्यास वाटेनाशी झाली. एके रात्रीं तें नेहमींप्रमाणें चरावयास शेतांत गेलें. त्या शेताच्या जवळच दुसरें एक उनाड गाढव चरत होतें. तें दुसरें गाढव आपल्या नेहमींच्या संवयीप्रमाणें मोठ्यानें ओरडूं लागलें. आपल्या जातभाईचा शब्द ऐकून या ढोंगी गाढवास फार आनंद झाला व तें आपलें नवीनच बसविलेलें गाणें अगदीं सुरावर गाऊं लागलें.

या ढोंगी गाढवास वाघ समजून त्या शेताचा मालक भिऊन लपून बसला होता. त्यानें हा प्रकार पाहिला. आपण ज्यास वाघ समजलों तें खरोखर एक गाढव आहे असें त्यास कळून आल्यावर मग कसला उशीर? त्यानें लगेच त्या ढोंगी गाढवास आपल्या सोट्यानें मरेमरेतों बडविलें.

# १२ : घटाकर्ण राक्षस

एका गांवाजवळ एक उंच डोंगर होता. या डोंगरावर पुष्कळ जंगल असून त्यांत बरींच माकडें राहात असत. या माकडांना एका प्रवाशाची एक घंटा मिळाली होती. माकडांचा स्वभाव मोठा खोडकर व गंमत्या असतो. तशांत ही घंटा मिळालेली! या घंटेसाठीं तीं आपापसांत भांडाभांडी करीत, आणि ती घंटा घेऊन पळत. यामुळें ती एकसारखी वाजे. डोंगरावर घंटा वाजे ती ऐकून गांवकऱ्यांस मोठें नवल वाटे. घंटा कोण वाजवितें याचे अनेक तर्क कुतर्क त्या गांवकऱ्यांत चालत.

एकदां एकजण म्हणाला—

'कायहो रावजी, काय हो हा विलक्षण प्रकार आहे? डोंगरावर घंटा कोठली?'

दुसरा म्हणाला—

'मी तरी काय सांगूं? पण मला आपली एक शंका आहे. डोंगरावर बहुधा एकादा वेताळ असावा, दुसरें काय! अहो, मी परवां भर रात्रीं डोंगरावर अनेक दिवे लागलेले पाहिले! कार तरी विलक्षण चमत्कार!'

यावर तिसरा म्हणाला–

'अहो, दिवे लागलेले मींसुद्धां पाहिले. तुम्ही म्हणतां, तेथें वेताळ असावा! पण माझा मात्र निराळा अनुभव आहे. परवांचे दिवशीं मी सहज त्या बाजूस गेलों होतों, तों एक भयंकर पुरुष पाहिला. बहुधा राक्षसच असावा तो.'

पहिला म्हणाला–

'अहो, घंटाकर्ण राक्षसच तो! मला तसें वाटलेंच होतें. पण म्हटलें आपणच कशाला बोला?'

झालें! त्या रानांत घंटाकर्ण राक्षस आहे, तो घंटा वाजवितो आणि केव्हां केव्हां पुष्कळ दिवेही तो लावतो असें जो तो दुसऱ्यास सांगूं लागला. कोणीही त्या रानांत फिरकेना! शेवटीं या घंटाकर्ण राक्षसाला ठार मारण्यासाठीं सर्व गांवकऱ्यांनीं मिळून जाहीर केलें कीं, 'जो कोणी या घंटाकर्ण राक्षसास नाहींसा करून त्याची घंटा आणून देईल त्यास मोठें बक्षीस मिळेल!'

बक्षीस तर जाहीर झालें; पण तें मिळविण्यास कोणी पुढें येईना! थोडे दिवस गेल्यावर मात्र एक मनुष्य हें बक्षीस मिळविण्यास पुढें आला.

हा मनुष्य इतका शूर का होता! छे! मुळींच न
पण त्या मनुष्याला ही घंटा कोण वाजवितें
पक्कें माहीत होतें. लोक मात्र समजत होते क
घंटाकर्ण राक्षस या गृहस्थासच ठार मारणार!

मग एके दिवशीं तो गृहस्थ पुष्कळ प्रकार
फळें बरोबर घेऊन त्या डोंगराजवळच्या जंगल
गेला. त्यानें तीं फळें रानांत जवळजवळ पसरू
ठेविलीं आणि तो जरा एकीकडे लपून बसल
थोडा वेळ गेला; आणि मग काय झालें?—

फळें पाहुनी येती खालीं वानर झाडावरुनी।
भांडाभांडी करुनी घंटा टाकियली मग त्यांनीं॥
उचलुनि ती हातीं, होई हर्षित तो चित्तीं॥ध्रु०॥

घंटा हातीं आल्यावर तो गृहस्थ तेथें मुळीं
थांबला नाहीं. लागलींच तो गांवांत आल., आणि
सर्वांना त्यानें ती घंटा दाखविली. घंटाक
राक्षसाची ही घंटा पाहण्यास लोकांची मोठी ग
झाली. सर्वांनीं त्या गृहस्थास शाबासकी दि
या दिवसापासून त्या अरण्यांत पुढें केव्हांही
वाजली नाहीं. तेव्हा घंटाकर्ण राक्षस ना
झाल्याची खात्री होऊन गांवकरी लोकांनीं जा
केलेलें बक्षीस त्यास दिलें.

# निवेदन

२५०२४ २२०९ ९/३/६०

संस्कृत वाङ्मयामध्यें हितोपदेशाला फार महत्त्वाचें स्थान आहे. ति व व्यवहार यांचा हितोपदेश हा एक आदर्शच होय. म्हणूनच पल्या या भरतखंडांत आज जवळजवळ दीड हजार वर्षें या ग्रंथाचा भ्यास परंपरेनें चालू आहे, इतकेंच केवळ नव्हे तर या ग्रंथाचीं ीय भाषांतून सुमारें वीस भाषांतरें झालीं आहेत.

मित्रलाभ, सुहृद्भेद, युद्ध व संधी असे या ग्रंथाचे चार भाग हित. या भागांतून एक मुख्य कथानक व तदंतर्गत सुमारें ३०-३२ ष्टी आहेत. सर्वच गोष्टी सुंदर आहेत. त्या वाचिल्यानें बालवाचकांचें रंजन तर होईलच, शिवाय, हितोपदेशांतील अजाण राजपुत्रांच्या ना जसें व्यवहारज्ञान आलें तसें व्यवहारज्ञानही त्यांस प्राप्त होईल.

हितोपदेश संस्कृत भाषेंत आहे; तेव्हां तो मूळ स्वरूपांत वाचण्यास उवाचकांना भाषेची अडचण आहे. हितोपदेशाचें समग्र मराठी भाषांतर प्रसिद्ध झालेलें आहे. परंतु या समग्र भाषांतरांत प्रत्येक गोष्टीशीं लग्न असा जो उपदेशपर अवांतर भाग तो मुलांस त्यांचे मनोधर्मा- प्रमाणें नीरस वाटतो आणि या समग्र भाषांतरापेक्षां त्यांतील केवळ गोष्टीच मुलांस आकर्षक वाटतात.

हितोपदेशाचा हा पहिला भाग लिहितांना हीच दृष्टी आम्ही ठेविली या भागांत बारा गोष्टी असून त्यांची भाषा सुबोध व आकर्षक गोष्टींत मधून मधून संवाद व प्रसंगोचित पद्यरचनाही केली चित्रांची योजनाही भरपूर आहे. सर्वांचा हेतु हा कीं, ही कृति बालकांना उपयुक्त व्हावी. तरी या कृतीस व प्रकाशकांच्या स योग्य तो आश्रय मिळेल अशी आशा आहे.

लेखक

६ सेप्टेंबर, १९२९

# दामोदर विठ्ठल फफे यांचीं पुस्तकें

## सुरस गोष्टी : १-२

शिशुवर्गाकरितां व पहिल्या इयत्तेकरितां खरोखरच सुरस अशा गोष्टींचे हे संग्रह मुलांनीं वाचावयास सुरुवात केल्यावर त्यांना खालीं ठेववत नाहींत, इतके ते मनोरंजक आहेत.

सुंदर चित्रें, किंमत ४ व ६ आणे

## बाल हितोपदेश : १—२

सुप्रसिद्ध हितोपदेशांतील निवडक मनोरंजन गोष्टी मुलांना वाचनाची आवड लागेल अशा चटकदार भाषेंत यांत दिल्या आहेत.

भरपूर चित्रें, मोहक दुरंगी कव्हर, किंमत प्रत्येकीं ६ आणे

## बारा गोष्टी

विविध अशा या बारा गोष्टी मुलांचें उत्तम मनरंजन करतात. गोष्टी निरनिराळ्या प्रकारच्या असल्यामुळें कंटाळा वाटत नाहीं.

मोठा साईज; भरपूर चित्रें, किंमत ६ आणे

के श व भि व

श्रीसमर्थ-सदन,
गिरगांव, मुंबई.

IRBK-0102992
IRBK-0102992

# बालवाचकांसाठीं गोष्टीच गोष्टी

हितोपदेशासारखीं पुस्तकें शेंकडों हजारों वर्षांपासून मुलांना आवडत आलीं आहेत. ह्या गोष्टींची गोडी कधींही कमी होत नाहीं. ह्या गोष्टींनीं शिकविलेलें शहाणपण कधींही फुकट जात नाहीं. खालीं दिलेलीं छोटीं पुस्तकें हितोपदेशाचींच भावंडें आहेत.

## बाल इसापनीति १–२
**त्र्यं. पु. थोरात**

इसापनें सांगितलेल्या माणसांच्या नि पशुपक्ष्यांच्या गोष्टी आणि त्यांनीं दिलेली शिकवण जगप्रसिद्धच आहे. 'इसापनीति' म्हणजे मुलांचा जुना मित्र.

प्रत्येकीं सहा आणे

## अद्भुत कथा १–२
**म. का. कारखानीस**

'ठिंगूजी', 'गडबडमामा' नांवेंच किती गमतीदार! जगांत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या, परीकथा आहेत ह्या.

प्रत्येकीं साडेपांच आणे

## कथामोहिनी १–२
**दा. पां. रानडे**

'टांगतें शहाणपण', 'बडबडी बायको' इत्यादि गोष्टींचें अद्भुत वातावरण मुलांना नेहमींच गुंग करीत आलें आहे.

प्रत्येकीं सहा आणे

## बाल पंचतंत्र १–२
**त्र्यं. पु. थोरात**

मैत्री कशी जुळते आणि तुटते हें आपल्याला बैलांपासून शिकावें लागलें ना? पंचतंत्रांत अशा कितीतरी गोष्टी आहेत.

प्रत्येकीं सहा आणे

## वेचलेलीं रत्नें १–२
**पाटकर व देसाई**

महाभारत म्हणजे गोष्टींचा सागर. त्यांतून वेचून काढलेल्या ह्या गोष्टी रत्नाच्या मोलाच्या असणारच.

प्रत्येकीं सहा आणे

## जगांतील शिशुकथा १–२–३
**भा. गो. व सौ. प्रभावती जोशी**

देशोदेशींच्या लोककथांतून निवडलेल्या ह्या अद्भुतरम्य गोष्टी तुम्हांला राक्षसांच्या नि पऱ्यांच्या राज्यांत नेतील.

१–२ प्र० ६॥ आणे, ३ रा, ८ आणे

केशव भिकाजी ढवळे, 'श्रीसमर्थ–सदन',
कर्नाटक प्रकाशन संस्था गिरगांव, मुंबई ४.